## -: प्रेसनोट दिनांक- १६/१२/२०२४ :-

**आरोपी इतर लोकसेवक भरत शंकर सुर्यवंशी वय - ४० वर्षे पद - बोरीवडे पोलीस पाटील, रा. बोरीवडे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी केलेबाबत.....**

---

यातील तक्रारदार यांच्याकडे बोरीवडे गावचे पोलीस पाटील सुर्यवंशी व कोडोली पोलीस स्टेशन येथील पोलीस अंमलदार यांनी, तक्रारदार यांना ते चोरून देशी दारू विक्री करतात या कारणासाठी तुझ्यावर दारू विक्री करतोस म्हणुन अर्ज आला आहे असे म्हणुन कारवाई करणार तसेच तक्रारदार यांना तुला जर दारू विक्री करायची असेल तर ५,०००/- रूपये दयावे लागतील अन्यथा कायदेशिर कारवाई करण्यात येईल असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे ५,०००/- रूपयांची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जामध्ये पडताळणी केली असता त्यामध्ये पोलीस पाटील सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचेवर कोडोली पोलीस ठाणे येथे दारूचे अनुषंगाने तक्रार दाखल असुन सदरची तक्रार कोडोली पोलीस ठाणे येथील पोलीस यांचेकडुन मिटवतो तसेच तक्रारदार यांना दारूचा धंदा सुरू करणेस यापुढेही परवानगी देतो यासाठी कोडोली पोलीस ठाणे येथील पोलीस यांना ५०००/- रूपये दयावे लागतील असे सांगुन तक्रारदार यांच्याकडे पोलीस पाटील सुर्यवंशी यांनी ५०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती ३,०००/- रूपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याबाबत तक्रारदार यांनी दिले तक्रारीवरून कोडोली पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर मार्गदर्शनानुसार आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ अजय चव्हाण, पो.ना. सुधिर पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.